International Indexed & Referred Research Journal, December, 2012, ISSN 0975-3486, RNI- RAJBIL- 2009/30097: VOL-IV, * ISSUE- 39

शोध पत्र- वाणिज्य

December,2012

# मेळघाट आदिवासींच्या आर्थिक समस्या व उपाय योजना

* प्रा. प्रफुल एस. वैराळे

* कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, चिखलदरा

**सारांश :-**मेळघाट आदिवासींसमोर अनेक प्रकारच्या समस्या आहेत. त्यात त्यांच्या आर्थिक समस्या ह्या त्यांच्या समोर तोंड वासुन उभ्या आहे. त्यासाठी शासनाच्या अनेक योजना मेळघाटात आदिवासींच्या कल्याण्यासाठी राबविल्या जातात पण त्यांच्या योजनांचा लाभ प्रत्येक्षात त्या आदिवासींना भेटतो का ? अदिवासी समाज इतर समाजापेक्षा सांस्कृतिक, आर्थिक, शैक्षणिक तसेच सामाजिक दृष्ट्या मागासलेला दिसून येतो. खरे तर आदिवासी या देशातील मुळ निवासी असुन आर्य भारतात येण्यापुर्वी आदिवासी हे सांस्कृतिक आणि आर्थिकदृष्ट्या संपन्न होते. पंरतु आर्याच्या आगमणानंतर त्यांच्याशी होत असलेल्या नेहमीच्या संघर्षामुळे आदिवासींना त्यांचे स्वतंत्र जीवन जगण्यासाठी जंगल डोंगरदऱ्याच्या आश्रय घ्यावा लागला. त्यामुळे आदिवासींच्या सुपीक जमीनीवर आणि संपन्न नगरांवर आर्यानी ताबा मिळविल्यामुळे आदिवासींच्या विनन्नावस्थेला सुरूवात झाली. आज चिखलदरा तालुक्यात आढळणारा आदिवासी समाज शेती व शेतमजुरी करीत आहे. त्यामुळे नागरी भागापासुन दुर आणि खडकाळ जमीन यामुळे आदिवासींची आर्थिक स्थिती फारच हलाखीची दिसून येते.

समाज व्यवस्थेतील एक महत्वाचा घटक म्हणजे आदिवासी समाज होय. विकासाच्या प्रक्रियेत समाजाच्या एखाद्या घटकांच्या समस्यांकडे दुर्लक्ष करता येणार नाही. आर्थिक विकासाच्या प्रक्रियेत सर्वच समाजाचा विकास घडवून आणणे अभिप्रेत असते. आदिवासी जमाती यांच्यामधील अंतर केवळ भौगोलिक नसून मुलतः सांस्कृतिक आणि आर्थिक स्वरूपाचे आहे. लोकशाही राज्य हे सर्व लोकांचे राज्य असल्यामुळे आदिवासी आणि इतर समाज यांच्यातील हे सांस्कृतिक आणि आर्थिक स्तरावरील अंतर कमी करणे आज आवश्यक आहे.

ब्रिटीश राजवटीत आदिवासींच्या विकासाचे प्रयत्न सुरू झाले. परंतु त्यांच्या या उद्देशामागे दयेसारख्या सात्विक भावना होत्या. त्याचप्रमाणे धर्मांतरासारखे काही राजस आणि समाज विच्छेदनासारखे तामस हेतुही होते. त्यामुळे ब्रिटीश राजवटीत आदिवासींचा आर्थिक विकास होवु शकला नाही.

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर भारतापुढे ज्या विविध समस्या होत्या त्यामध्ये दरिद्रयाचे मोठे प्रमाण ही एक महत्वाची समस्या होती. देशाच्या आर्थिक विकासाबरोबर दारिद्रयाचे प्रमाण कमी होत गेले हे नाकारून चालणार नाही. असे असले तरी आदिवासी समाजामधील दारिद्रयाचे प्रमाण घटविण्यात शासनाला म्हणावे तसे यश मिळू शकले नाही. त्यामुळेच १९९९-२००० मध्ये आदिवासी समाजातील दारिद्रयाचे प्रमाण ४३.७६ एवढे अधिक असल्याचे दिसून येते. यामागे आदिवासींच्या आर्थिक परिस्थिती अतिशय बिकट असल्याचे दिसून येते.

अमरावती जिल्ह्यातील मेळघाट क्षेत्र सातपुडा पर्वतातील जंगल व्याप्त व दुर्गम क्षेत्र म्हणून आपणास परिचीत आहेत. मेळघाटात काही ठिकाणी विपुल जैविक विविधता, औषधी वनस्पती अशी संपत्ती येथे अस्तित्वात आहे. मागास क्षेत्र म्हणून विविध समस्यांनी ग्रस्त असलेल्या मेळघाटातील बहुसंख्य आदिवासींचे जीवन अत्यंत हलाखीचे आहे असे दिसुन येते. सातपुड्यातील मेळघाट व्याघ्र प्रकल्प इ.स.१९७३ रोजी घोषीत करण्यात आला अत्यंत दुर्गम अशा कडेकपारी दऱ्याखोरे त्यातच जंगली प्राण्याचा सुळसुळाट व आदिवासी लोकांचे वास्तव्य असणारा मेळघाट व्याघ्र प्रकल्पामुळे लोकांच्या परिचयाचा आहे. मेळघाट चिखलदरा व धारणी या तालुक्यातील बहुसंख्य गावे दुर्गम भागात डोंगरदऱ्यात गावे वसली आहे. त्यांच्या गरजापुर्ती व उदरनिर्वाह वनउपज, शिकार, शेती यावर अवलंबुन आहे. दुर्गम भागात असल्याने व विकासाच्या प्रवाहात न आल्याने आजही हे लोक मागास आहेत. त्याच्या अनेक समस्या आहेत.मेळघाट परिसरातील बहुसंख्य लोक शैक्षणिक, आर्थिक व सामाजिक दृष्ट्या मागास असल्याने त्यांचे जीवनमान कनिष्ठ (निम्न) स्वरूपाचे आहे.

मेळघाट परिसरात कोरकू आदिवासी जमातीच्या विविध समस्या आहेत. या सर्व समस्यामध्ये कुपोषणाची समस्या अतिशय महत्वाची आहे. त्याची आर्थिक परिस्थिती अतिशय दयनीय आहे. त्यांना दोन वेळचे पोटभर अन्न मिळत नाही प्रसुतीकाळात मातेला सकस आहार मिळत नसल्यामुळे मातामृत्यु, बालमृत्यु व कुपोषण या समस्येला आदिवासींना सामोरे जावे लागते. १९९३ पासून कोरकु जमातीची कुपोषणाची समस्या वृत्तपत्राच्या माध्यमातुन संपूर्ण देशाला कळाली.

मेळघाट आदिवासी मध्ये आर्थिक प्रश्न देखील विशेष महत्वाचा आहे. कारण येथील आदिवासी कोरकु जमात शेती करतात. परंतु त्यांना शेतीतुन विशेष उत्पन्न मिळत नाही सुधारीत शेती कशी करावी याचे त्यांना ज्ञान नाही. त्यामुळे मातामृत्यु, बालमृत्यु, कुपोषन स्थलांतर, असुधारीत शेती, वेठबिगारी, व्यसनाधिनता, शैक्षणिक उदासिनता, वेश्या व्यवसाय, आरोग्य विषयक अशा अनेक प्रकारच्या समस्या चिखलदरा तालुक्यातील आदिवासी जमाती समोर तोंड वासुन उभ्या आहे. या भागातील रहिवासी अर्थिक व सामाजिक दृष्ट्या मागास आहेत. त्यांच्या विकासाकरीता शासनाने विविध विभागाव्दारे विविध योजना अमलात आणल्यात पण अशा योजनांच्या बाबतीत मुल्यमापन मात्र झाले नाही.

**आदिवासींच्या आर्थिक समस्या :-**

१) आदिवासी जमात शेती कसणाच्या जुनाट पद्धती हे सुद्धा आदिवासींच्या आर्थिक समस्येचे कारण आहे. शेतीत देशी किंवा घरी

साठवुन ठेवलेले बियाणे आदिवासी वापरतात. शेण खतांचाही वापर पुरेसा केला जात नाही. शेतात वापरली जाणारी बरीचशी बरीचशी अवजारेही हातांनी बनवलेली असतात. ती तितकीशी उपयुक्त नसतात. त्यामुळे शेतीचे उत्पन्न वाढत नाही.

२) स्थानांतरीत शेतीमुळे ते आपल्या शेतीचा विकास करू शकत नाही. या प्रकारच्या शेतीतून किमान गरजा भागाविण्याइतके देखील उत्पन्न आदिवासींयाना होत नाही.

३) पूर्वी आदिवासी जंगलातील वस्तु गोळा करून त्यावर आपला उदरनिर्वाह करित होते. परंतू शासनाने जंगल विषयक कायदे केले. त्यामुळे जंगलातील संपत्तीवर त्यांचा कोणताही अधिकार राहीला नाही. जंगलामधील नैसर्गिक वस्तुचाही उपभोग घेवू शकत नाही. जंगलातील शिकार करणे, दारू गाळणे, मध गोळा करणे आणि इतर जंगलातील वस्तु गोळा करणे इत्यादीवर जंगल विषयक कायद्यामुळे निर्बंध टाकण्यात आले आहे.

४) आदिवासींच्या आर्थिक स्थितीस कारणीभूत असणारा महत्वाचा घटक म्हणजे पुरेशा रोजगाराचा अभाव होय. आदिवासींना बाराही महिणे रोजगार मिळत नाही. त्यांना काही महिने हे बेकारीत घालवावा लागतो. वर्षातील बराच काळ कामाशिवाय बसुन रहावे लागत असल्याने त्यांच्या आर्थिक समस्येत वाढ होते.

५) अशक्यपणा किंवा कुपोषण आणि दारिद्रय यांचाही जवळचा संबंध आहे. वर्षातील काही दिवस होणाऱ्या उपासमारीमुळे प्रौढ व्यक्तीही अशक्त किंवा कुपोषित होतात. त्यामुळे जेवळे दिवस काम उपलब्ध असते. तेवढे दिवस काम करता येत नाही. अशा प्रकारे उपासमारीमुळे दारिद्रय आणि दयनिय आर्थिक परिस्थितीमुळे उपासमारीचा प्रश्न निर्माण होतो.

६) सभ्य समाजापासून दुर असणाचा आदिवासी समाजाच्या अज्ञानाचा फायदा घेऊन व्यापारी, सावकार, यांनी त्यांचे आर्थिक शोषन करत आहे. ठेकेदार आणि सावकार आदिवासीला थोडी कर्जाऊ रक्कम देऊन त्यावर भरमसाठ व्याज लावतात. त्यामुळे अनेक आदिवासी हे कर्जबाजारी झाले आहे.

७) कर्जावरील व्याजाचा मोठा दर हे सुद्धा आर्थिक समस्येचे एक कारण आहे. आदिवासींना उपभोग कर्जावर दरसाल दर शेकडा ५० टक्के पासुन १०० टक्के पर्यंत व्याज द्यावे लागते. मजुरीचे बरेचसे उत्पन्न कर्जफेडीतच खर्च होते. त्यामुळे आदिवासी

८) औद्योगिक क्षेत्राजवळ राहणाऱ्या आदिवासींना अल्प मोबदला देऊन त्यांच्या कडून मेहनतीचे काम करून घेतले जाते. त्या ठिकाणी कोणत्याही सोयी, सवलती त्यांना पुरविल्या जात नाही त्यामुळे औद्योगिक क्षेत्रात काम करणाऱ्या श्रमीक आदिवासींची परिस्थिती अतिशय दयनीय आहे.

९) व्यापारी ठेकेदार आणि अधिकारी आदिवासी कडून आपली सर्व कामे जबरदस्तीने करवुन घेतात आणि त्यांना त्या कामाचा अतिशय अल्प मोबदला देतात. सावकार आणि जमिनदारांच्या शेतीत अनेक आदिवासी लोक आयुष्यभर काम करतात त्यांना ते गुलामासारखे वागवितात. वेठबिगारीच्या पद्धतीने आदिवासींचे शोषण केल्या जाते.

१०) व्यसनाधीनता ही अदिवासी जमातीमध्ये मोठ्या प्रमाणात आढळून येते. स्त्री असो वा पुरूष, कोणत्याही वयाचे असो ते व्यसन करतात. व अंगमेहनतीचा पैसा ते व्यवनात गमावून बसतात.

मेळघाट चिखलदरा व धारणी तालुक्यातील आदिवासींच्या समस्याचे निराकरण करून त्यांच्या जिवनमानात सुधारणा द्यावी यासाठी असलेल्या शासनांच्या योजनांची बहुसंख्य अदिवासी जमातीला माहिती नसल्याने विकास योजनांच्या निमिर्ती झाली त्यांना विशिष्ट नाव देऊन अंमलबजावणीची प्रक्रियाही सुरू आहेच. पण या योजना नेमक्या कशासाठी, कोणासाठी हे मेळघाट चिखलदरा व धारणी तालुक्यातील आदिवासींना पुर्णपणे समजलेच नाही. बहुसंख्य आदिवासी या कार्यापासून अन्नभिन्न आहेत. शासकीय यंत्रणा योजनांची माहिती आदिवासी जमातीपर्यंत पोहचविण्यास कमी पडली तर दुसरीकडे चिखलदरा तालुक्यातील गावे, दुर्गम व दळणवळणास कठीण असल्याने तसेच आदिवासी जमातीमध्ये साक्षरतेचे अल्प प्रमाण व शहरी लोकांपासुन अंतर राखुन वागण्याचा आदिवासी जनतेचा मुळ स्वभाव यामुळे शासकीय कर्मचारी व आदिवासी यांचा योग्य संवाद होत नाही सर्व विकास योजनांची माहिती आदिवासींना नसण्याबाबत ते स्वतः जबाबदार राहु शकत नाही. कारण ते मुळातच मागास आहे. त्यामुळे विकास योजना ठरविणारी व योजनांची अमंलबजावणी करणारी यंत्रणा याला जबाबदार आहेत. कारण योजनांची माहिती आदिवासी जनतेला देऊन त्यांची अंमलबजावणी करण्याची जबाबदारी शासकीय यंत्रणेवर आहे.

आदिवासी भागातील विकास योजनांचे मुल्यमापन करण्याची गरज राष्ट्रीय अनुसूचित जाती आणि जन जाती आयोगाच्या तिसरा अहवालात १९९४-९५ साठी व्यक्त करण्यात आली. आयोगाच्या शिफारशीवरून आदिवासी विकास योजनांच्या मुल्यमापनाची गरज आहेच हे त्यात आढळून आले त्याकरिता योग्य उपाययोजना नेमणे अंत्यत गरजेचे आहे. की त्यातून चिखलदरा तालुक्यातील आदिवासींचा विकास होवु शकेल.

**उपाय-योजना :-**

१) मेळघाट चिखलदरा व धारणी तालुक्यामधील प्रत्येक आदिवासी कुटूंबातील व्यक्तीला बारमाही रोजगार मिळून देण्याची व्यवस्था करावी.

२) मेळघाट आदिवासींचा जास्तीत जास्त शैक्षणिक दर्जा वाढविण्याकरीता विविध योजना राबविण्यात याव्या.

३) शासनांच्या विविध योजनांच्या बद्दलची माहिती व उपयोग काय आहेत. याबद्दल शासनाच्या विविध यंत्रणेमार्फत आदिवासी पर्यंत पोहचली पाहिजे अशी व्यवस्था करण्यात यावी.

४) आदिवासी करीता ज्या विविध योजना त्यांच्यामार्फत पोहचल्या पाहिजेत परंतू लाभार्थीपर्यंत पोहचण्या अगोदर त्यात भ्रष्टाचार मोठ्या प्रमाणात होतो. हा भ्रष्टाचार त्वरीत बंद करण्यात यावा.

५) शासकीय प्रशासन व आदिवासी जमातीतील लाभार्थी त्यांच्यामध्ये सुसंवाद होणे अतिशय गरजेचे आहे.

६) शासनांच्या ज्या विविध योजना दरवर्षी तयार होतात. अशा योजनामधुन आदिवासींना प्रथम प्राधान्य देवून आदिवासींना रोजगाराची संधी उपलब्ध करून द्यावी.

७) आदिवासींची आर्थिक स्थिती अतिशय बिकट आहे. ही परिस्थिती सुधारण्याकरीता शासनाने यांच्याकडे लक्ष देवून सुधारणा करावी.

८) आदिवासीमध्ये भूमीहीन मजुराचे मोठे प्रमाण आहे. हे मोठे प्रमाण

विचारात घेता शासनाच्या ताब्यातील जमीनीचे वाटप भूमीहीन आदिवासींमध्ये करावे की, जेणे करून भूमीपुत्रांना योग्य न्याय देता येईल.

९) मेळघाट चिखलदरा व धारणी तालुक्यातील आदिवासींमध्ये व्यावसायिक तसेच स्वंयरोजगाराचे प्रमाण कमी आहे. तेव्हा व्यावसायिक शिक्षण सुविधेत वाढ करून स्वयंरोजगाराचे प्रशिक्षण आदिवासी मुलांना दिले जावे.

१०) आदिवासी महिलांच्या प्रसुती अगोदर व प्रसुतीनंतर मातेला पोटभर अन्न तसेच सकस आहार या योजनांना प्राधान्याने राबवून मातामृत्यु, बालमृत्यु तसेच कुपोषण थांबविण्यासाठी प्रयत्न करावे.

११) आदिवासींना स्थानिक भागातच विविध प्रकारचे रोजगार शासनाने देवून त्याचे स्थलांतर रोखावे.

१२) आदिवासी जमातीने शेतीमध्ये संकरीत बियाणे आणि रासायनिक खते यांचा वापर शेतीत करावा. त्यामुळे शेतीच्या उत्पन्नात वाढ होऊ शकेल. त्यामुळे अन्न टंचाईचा प्रश्नही सुटेल आणि अधिक उत्पन्न मिळून सिमांत व अल्पभूधारक शेतकऱ्यांचा आर्थिक प्रश्न संपुष्टात येऊ शकेल.

१३) मेळघाट चिखलदरा व धारणी तालुक्यामधील ऐच्छिक संघटनांनी स्वत:चे साम्राज्य निर्माण करण्यापेक्षा आदिवासींच्या समस्येकडे लक्ष देण्याची गरज आहे.

## संदर्भ ग्रंथ


१) सरकार एस.मिश्रा एस., दयाल एच. नाथन डी. शेड्युल ट्राईब्स् ऑफ इंडीया, न्यु दिल्ली पृष्ठ क्र. ९

२) नाथगोंडे गुरूनाथ, भारतीय आदिवासी, कॉन्टेबेटल प्रकाशन, पुणे पृष्ठ क्र. २५६

३) डॉ. कुलकर्णी शौनक, महाराष्ट्रातील आदिवासी, डायमंड पब्लीकेशन, पुणे, पृष्ठ ७८

४) डॉ. पाटील अशोक, कोरकु जनजीवन, पृष्ठ २३

५) देशपांडे दि.के., आधुनिक भारताचे आर्थिक प्रश्न व नियोजन, १९९८

६) दत्त रूदर, सुंदरम के.पी.एम. १९९८, Indian Economy, पृष्ठ ५७५

७) नाग. डि.एस., Tribal Economy Delhi - १९५८

८) डॉ. कुलकर्णी शौनक, महाराष्ट्रातील आदिवासी, डायमंड पब्लीकेशन, पुणे पृष्ठ १०१

९) नाथगोंडे गुरूनाथ, भारतीय आदिवासी, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, पृष्ठ क्र. ३५३

१०) आदिवासी विकास विभाग, महाराष्ट्र शासन मंत्रालय, मुंबई - ४०००३२, २००६

११) तहसिल कार्यालय, चिखलदरा अहवाल, ता. चिखलदरा जिल्हा अमरावती राज्य महाराष्ट्र